# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

**(Formerly Pune University)**

**Ganeshkhind, Pune – 411007**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनीक्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone: 020-25621188/89
ईमेल / Email :affiliation@pun.unipune.ac.in

**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**
Academic Section (Affiliation Unit)
**वेबसाइट/Website:** www.unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीए/ ३४५८ दिनांक : २८ ऑगस्ट, २०२५

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित
पुणे जिल्हयातील सर्व व्यावसायिक महाविद्यालये / परिसंस्था

**विषय : पुणे जिल्हयातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणेबाबत...**

**संदर्भ** : मा.प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे संदर्भ पत्र क्र. तंशिविकापू/शैक्षणिक वि–६/२०२५–२६/३०६९, दि. २६ ऑगस्ट, २०२५

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की केंद्र शासनाच्या CSC 2.0 योजनेअंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून सदर **'आपले सरकार सेवा केंद्राचे'** स्थापन, संनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविले आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणेबाबतची मागणी करण्यात येईल, त्या महाविद्यालयांना सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दिनांक १९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करणेस मान्यता देण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता (बहुउद्देशिय सभागृह), ५ वा मजला येथे आयोजित केली आहे. तरी आपणास याद्वारे कळविण्यात येते की, संस्थेचे प्राचार्य/रजिस्ट्रार यांनी सदर कार्यशाळेस न चुकता उपस्थित राहावे. (स्वत: मा.जिल्हाधिकारी, पुणे सदर कार्यशाळेस संबोधित करणार आहेत.)

कळावे,

आपली,

(सुनिता हजारे)
**उपकुलसचिव**

**सोबत : वरीलप्रमाणे**

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
दिनांक 28/08/2025
आवक क्र. CA/3080

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/व, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा.क्र.तंशिविकापू/शैक्षणिक वि -६/ २०२५-२६ / 3069 दिनांक: 26 AUG 2025

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 5290
दिनांक : 28.08.2025
दाखल दिनांक 28.08.2025
विभाग :

DR/affiliation

ptz Urgent forward to affiliate colleges institute

प्रति,
प्राचार्य / संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
पुणे जिल्ह्यातील
सर्व व्यावसायिक शिक्षण संस्था

विषय- पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबत....
संदर्भ - १) मा. जिल्हाधिकारी कार्यालय ,पुणे यांचे पत्र क्रमांक क्र/सेतू/५४६/२०२५ दिनांक २०/०८/२०२५
२) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/मावतं / दि.२०/०८/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की केंद्र शासनाच्या CSC २.० योजनेंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आलेल्या असून, सदर " आपले सरकार सेवा केंद्राचे " स्थापन, संनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविले आहे. सदर शासन निर्णयात नमूद केलेनुसार ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबतची मागणी करण्यात येईल, त्या महाविद्यालयांना सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.१९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करणेस मान्यता देणेत आली आहे.

सदर आपले सरकार सेवा केंद्र आपल्या महाविद्यालयात सुरु केल्यास महाविद्यालयातील तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे दाखले ( जातीचा/ उत्पन्नाचा /नॉन क्रीमी लेअर / वय, राष्ट्रीयत्व, अधिवास दाखला इत्यादी ) काढण्यासाठी सुविधा निर्माण होईल व त्याचा फायदा सर्वांना घेता येईल.तसेच या सुविधेसाठी संस्थेस शुल्क प्राप्त होणार आहे . तरी सर्व संस्थांनी ही सुविधा आपल्या संस्थेत सुरु करावी.

त्या अनुषंगाने महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा दि. २९/०८/२०२५ रोजी दुपारी ३. वाजता ( बहुउद्देशीय सभागृह ) , ५ वा मजला येथे आयोजित केली आहे. तरी आपणास याद्वारे कळविणेत येते की, संस्थेचे प्राचार्य / रजिस्ट्रार यांनी सदर कार्यशाळेस न चुकता उपस्थित राहावे . ( स्वतः मा. जिल्हाधिकारी सदर कार्यशाळेस संबोधित करणार आहेत.)

सोबत-वरीलप्रमाणे

श्री- जाधव Urgent pl.
28/8/25

(म.रा.जाधव.)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १) मा. जिल्हाधिकारी कार्यालय ,पुणे यांना माहितीसाठी
२) प्रोग्रामर , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळा वर प्रदर्शित करण्याकरिता

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.
(सर्वसाधारण शाखा)
बी विंग, तिसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे स्टेशन, पुणे-४११००१.

| दुरध्वनी क्र.-०२०२६१२२३७० | E-mail id :- gbpune2016@gmail.com |
|---|---|

क्र/सेतु/५४६/२०२५/ E.No.-                                                            पुणे दि.२०/०८/२०२५

प्रति,
विभागीय सह संचालक
(उच्च शिक्षण) पुणे विभाग,पुणे.

विषय:-पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबत..
संदर्भ:सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय
क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/माहित/ दि.२०/०८/२०२४.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या CSC २.० योजनेतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आलेल्या असून,सदर आपले सरकार सेवा केंद्राचे स्थापन,संनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविले आहे,सदर शासन निर्णयात नमूद केलेनुसार ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबतची मागणी करण्यात येईल,त्या महाविद्यालयांना सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.१९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करणेस मान्यता देणेत आली आहे.

त्या अनुषंगाने महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा दि.२९/०८/२०२५ रोजी आयोजित करणेत येणार आहे.तरी आपणास याद्वारे कळविणेत येते की,आपल्या अधिनस्त सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सदर कार्यशाळेस उपस्थित राहणेकामी आपले स्तरावरून सूचित करावे.तसेच सदर कार्यशाळेचे नियोजन करणेकामी दि.२६/०८/२०२५ रोजी ११:०० वाजता या कार्यालयात बैठकीसाठी उपस्थित राहावे.

(ज्योती कदम)
निवासी उपजिल्हाधिकारी,पुणे.

राज्यातील महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)
शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/मावतं
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
दिनांक - २० ऑगस्ट, २०२४.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९.०१.२०१८
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.३१.०७.२०२४ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या CSC २.० योजनेंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून, सदर आपले सरकार सेवा केंद्राचे स्थापन, सनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविले आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये अहमदनगर जिल्ह्यातील १० तालुक्यामधील १५ महाविद्यालयांत प्रायोगिक तत्वावर आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

शासनाचा सदर निर्णय हा राज्यामध्ये अतिशय लोकप्रिय झालेला असून, अशा प्रकारे महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत राज्यातील इतर ठिकाणावरुनही मागणी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव, सदर निर्णय राज्यभर लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील ज्या ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात येईल, त्या त्या महाविद्यालयांना उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१९.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरुन आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाविद्यालयातील आपले सरकार सेवा केंद्रास मंजूरी देतांना संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या सल्ल्याने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच सदरील कार्यवाही करतांना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या. (महाआयटी), मुंबई यांचेशी तांत्रिक सहाय्याकरीता समन्वय साधावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०८२०१२०४३१८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUDAM EKNATH
ANDHALE

( सुदाम आंधळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,